# जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय,अकोला.

दुरध्वनी क्र. 0724-2424442
email address -rdc_akola@redimail.com

फॅक्स 0724-2435007
web address :www.akolanic.in

**क्र.कक्ष-2/प्रस/गृह/कावि- 299 /2020** **दिनांक: 11 / 05 /2020**

## आदेश

ज्याअर्थी, कोरोना विषाणु प्रादुर्भाव संपुर्ण जगात सुरु असून कोरोना विषाणु प्रादुर्भाव रोखण्याचे दृष्टीने महाराष्ट्रात दिनांक 22/03/2020 पासून लॉकडाऊन करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, लॉकडाऊन काळात मोठ्या प्रमाणात भारतातील शिक्षण घेण्यास्तव विदेशात गेलेले विद्यार्थी / प्रवासी अडकुन पडलेले असून सदर विद्यार्थी / प्रवासी भारतात परत आणन्याबाबत ची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी उपोरक्त कार्यवाही नुसार जिल्हयातील विदेशात अडकलेले विद्यार्थी देखील जिल्हयात परत येतील.

त्याअर्थी,जिल्हयात परत येणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाचे **निर्देशानुसार 14 दिवस अलगीकरण करण्याचे निर्देश असल्याने विदेशातुन** जिल्हयात येणाऱ्या **विद्यार्थी / प्रवाशांना <u>त्यांच्या</u> <u>स्वखर्चाने</u>** जिल्हयात कोरोंटाईन करण्यासाठी खालील दोन हॉटेल्स मध्ये व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**सदर विषयाचे संपुर्ण सनियंत्रणाची जबाबदारी या आदेशाव्दारे श्री विजय लोखंडे, तहसीलदार,अकोला यांचे कडे सोपविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | हॉटेल चे नाव | पत्ता |
|---|---|---|
| 1 | हॉटेल जसनागरा | स्टेशन जवळ,ता.जि.,अकोला |
| 2 | हॉटेल सिटी स्पोर्टस क्लब | मुर्तिजापूर रोड,अकोला. |

तहसीलदार,अकोला यांना निर्देशीत करण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे विदेशातुन येणाऱ्या विद्यार्थी / प्रवासी यांची व्यवस्था **देय तत्वावर (Pay & Live)** करावयाची असून हॉटेल मधील निवास व तत्समबाबींबाबतचा संपुर्ण खर्च विद्यार्थी / प्रवाशांनी करावयाचा असल्याने त्यांना अशा स्पष्ट सुचना त्यांना देण्यात याव्यात.

तहसीलदार,अकोला यांना याव्दारे निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांशी सतत संपर्कात राहून जिल्हयात येणाऱ्या विदेशातील विद्यार्थी / प्रवाशांना उपरोक्त दोन हॉटेल्स् मध्ये स्थानांतरीत करणे तसेच याबाबत च्या तत्सम सर्व बाबी पार पाडव्यात व एस.टी.महामंडळाकडून जिल्हयात येणाऱ्या विदेशातील विद्यार्थी/प्रवशी यांचे संपुर्ण माहितीचे विवरण तयार करुन कोव्हीड-19 कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालयात दररोज सायंकाळी 5.00 वाजता न चुकता सादर करावे.

(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)
जिल्हादंडाधिकारी,अकोला.

प्रतिलिपी:

1. उपविभागीय अधिकारी,अकोला यांना माहितीस्तव.
2. तहसीलदार,अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
3. श्रीमती चेतना राजेश खिरवाडकर, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव, विदेशातुन येणाऱ्या विद्यार्थी / प्रवासाबाबत त्यांचे नाव, भ्रमणध्वनी क्रमांक,राहण्याचा पत्ता इत्यादी माहिती प्रवासाचे वेळीस प्राप्त करुन घेण्याबाबत संबंधीतांना अवगत करावे व सदर माहिती वेळो-वेळी या कार्यालयास सादर करावी.

(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)
जिल्हादंडाधिकारी,अकोला.